Pune Police

दिनांक:- २६/०४/२०१७
चंदननगर पो.स्टे. पुणे शहर

## प्रेस नोट

### बडिकॉप प्रतिसाद ॲपच्या सहाय्याने महिलांविषयक दुसरा गुन्हा उघड

चंदननगर पोलीस स्टेशन गु.र.नं. १००/२०१७, भा. द. वि. कलम ३५४, ३५४ (क) मधील फिर्यादी रेमिजीन बाझील फर्टाडो, वय २६ वर्षे, रा. फलॅ.नं. ५, सिल्व्हर प्लाझा, फातिमानगर, वानवडी, पुणे हया दिनांक २५/०४/१७ रोजी त्यांचे ट्रायंट ग्लोबल सर्व्हिसेस प्रा.लि., युनिट नं. ५०६, वर्ल्ड ट्रेड सेंटर, खराडी, पुणे हया रात्री २१.४५ वा. त्यांचे कंपनीमध्ये डयुटीवर असतांना कंपनीचे टॉयलेटमध्ये गेल्या असता, पंचशिल रिॲलीटीमध्ये काम करणारा कर्मचारी नामे राजकमल राजबहाद्युर यादव, वय २४, रा. गट नं. ६, १४/२, थिओवस्ती, खराडी, पुणे मुळ पत्ता- मर्दन शहापुर, पो. साढा, जि. बदोही, राज्य- बिहार याने त्यांचेमागे लेडीज टॉयलेटमध्ये घुसून फिर्यादी यांचे मोबाईलमध्ये फोटो काढुन, त्यांचे हातास धरुन, हिसका मारुन, ढकलुन, त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे.

आरोपी राजकमल राजबहाद्युर यादव हा पुर्वी वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे सुमारे २ वर्षेपासुन हाऊस किपींगचे काम करीत होता. आता सुमारे २ महिन्यांपासुन तो पंचशिल रिॲलीटीमार्फत हाऊस किंपींगची कामे करीत आहे.

वरील घटनेबाबत कंपनीचे एच. आर. मॅनेजर मंजुश्री रॉय यांनी बडीकॉपचे व्हॉटसॲप ग्रुपवर मेसेज केल्याने लागलीच सपोनि. राजेंद्र मगर व पो.ना. ७६४९, शिवशरण, पोना. १७०४, माने यांनी घटनास्थळी जावुन आरोपीस ताब्यात घेवुन फिर्यादी यांचे तक्रारी जबाबानुसार वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मा. पोलीस आयुक्त, श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दिपक साकोरे, आणि बडीकॉप टिमचे प्रमुख श्री. पंकज घोडे, श्री. प्रणित कुमार यांच्या अथक प्रयत्नातून साकार झालेले असुन बडीकॉपच्या साहाय्याने यापुढे आयटी क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षासंबधाने गंभिर गुन्हयांना अटकाव व प्रतिबंध होणेसाठी चांगल्याप्रकारे मदतच होणार आहे.

इकडील पोलीस स्टेशनला बडिकॉपचे दोन ग्रुप तयार करण्यात आलेले असुन त्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक (गुन्हे) व एक बडिकॉप म्हणुन पोलीस उप निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. राजेंद्र गिरी, खराडी पोलीस चौकी हे करीत आहेत.